महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
प्रकाशगड, ५ वा मजला, स्टेशन रोड, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
दु.क्र.(ऑ.)२६४७४२११, २६४७२१३१ वि.क्र.३६१९ (वै.)२६४७४७५३ फॅक्स : ०२२.२६४७२३६६

मुअ(वा)/लेखा/ईडी-७/ No 02656 दिनांक : 20 JAN 2011

परिपत्रक : १३७

विषय :- अपारंपारिक ऊर्जा निर्मिती प्रकल्पांना वीज शुल्क माफी / सुट.

संदर्भ :- शासन अधिसुचना क्र. ईएलडी २०१०/प्र.क्र.२५६/ऊर्जा-१ दि. १८.११.२०१०.

शासनाने, शासन निर्णय क्रमांक-एपीयु-२०१०/सीआर २५६/ऊर्जा-१/, दिनांक १४.१०.२००८ अन्वये जाहीर केलेले अपारंपारिक ऊर्जा स्त्रोतांपासून ऊर्जा निर्मितीचे नवीन धोरण -२००८ अनुसार निर्णयामध्ये व्याप्त असणा-या स्वत:च्या वापरासाठी स्थापन केलेल्या, सर्व ऊर्जा निर्मिती प्रकल्पांपासून निर्माण झालेल्या ऊर्जेच्या वापराला, असे ऊर्जा निर्मिती प्रकल्प दिनांक १४.१०.२००८ रोजी वा त्यानंतर कार्यान्वीत झाल्याच्या दिनांकापासून पहिल्या १० वर्षाकरिता, उक्त अधिनियमाच्या अनुसूचीच्या भाग ग च्या खंड (ब) खाली देय असलेले संपूर्ण वीज शुल्क भरण्यापासून सूट देण्यात आलेली आहे. तद्नुसार कार्यवाही करावी.

सहपत्र:वरीलप्रमाणे

मुख्य अभियंता (वाणिज्य)

प्रत सविनय सादर - (माहितीस्तव सादर)

१) मा. व्यवस्थापकीय संचालक (महावितरण), मुंबई.
२) मा. संचालक (वित्त), महावितरण, मुंबई.
३) मा. संचालक (संचलन), महावितरण, मुंबई.
४)मा. कार्यकारी संचालक (वा), महावितरण, मुंबई.
५) मा.प्रादेशिक कार्यकारी संचालक-१,२,३, महावितरण, कल्याण / पुणे / नागपूर.

प्रत सस्नेह रवाना :-

मुख्य अभियंता, महावितरण, सर्व सं व सु परिमंडळे कार्यालये .

प्रत रवाना :-

अधिक्षक अभियंता, महावितरण,सर्व सं व सु मंडळ कार्यालय.

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार-ब

वर्ष २, अंक ८६(२)] शुक्रवार, नोव्हेंबर १९, २०१०/कार्तिक २८, शके १९३२ [पृष्ठे ३
किंमत :- रुपये २८.००

असाधारण क्रमांक १६६

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेलं (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १८ नोव्हेंबर २०१०

अधिसूचना

मुंबई विद्युत शुल्क अधिनियम, १९५८.

क्रमांक इएलडी. २०१०/प्र.क्र.-२५६/ऊर्जा-१.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, शासन निर्णय क्रमांक एपीयू. २०१०/सीआर.-२५६/ऊर्जा-१, दिनांक १४ ऑक्टोबर २००८ अन्वये जाहीर केलेले अपारंपरिक ऊर्जा स्रोतांपासून ऊर्जा निर्मितीचे नवीन धोरण-२००८ अनुसार जनहितार्थ अपारंपरिक ऊर्जा स्रोतांपासून वीज निर्मितीस प्रोत्साहन देण्याच्या शासनाच्या धोरणानुसार राज्यामध्ये स्वतःच्या वापरासाठी स्थापित केलेल्या अपारंपरिक ऊर्जा निर्मिती प्रकल्पांना वीज शुल्क भरण्यापासून १० वर्षांसाठी सूट देणे इष्ट आहे.

त्याअर्थी, आता, मुंबई वीज शुल्क अधिनियम, १९५८ (१९५८ चा मुंबई चाळीस) याच्या कलम-५अ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे, महाराष्ट्र राज्यात,

उक्त धोरणानुसार स्वतःच्या वापरासाठी स्थापन केलेल्या, उक्त दिनांक १४ ऑक्टोबर २००८ च्या शासन निर्णयामध्ये व्याप्त असणाऱ्या सर्व ऊर्जा निर्मिती प्रकल्पांपासून निर्माण झालेल्या ऊर्जेच्या वापराला, असे ऊर्जा निर्मिती प्रकल्प दिनांक १४ ऑक्टोबर २००८ रोजी वा त्यानंतर कार्यान्वीत झाल्याच्या दिनांकापासून पहिल्या १० वर्षांकरिता, उक्त अधिनियमाच्या अनुसूचीच्या भाग 'ग' च्या खंड (ब) खाली देय असलेले संपूर्ण वीज शुल्क भरण्यापासून सूट देत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

दि. का. खरात,

शासनाचे उप सचिव.

INDUSTRIES, ENERGY AND LABOUR DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 18th November 2010

NOTIFICATION

BOMBAY ELECTRICITY DUTY ACT, 1958.

No. ELD. 2010/CR-256/NRG-1.—Whereas, in pursuance of the Non-Conventional Energy Generation Policy 2008, declared by the Government of Maharashtra, *vide* Government Resolution, Industries, Energy and Labour Department, No. APU. 2007/CR-693/NRG-7, dated 14th October 2008, it is expedient in the public interest to exempt non-conventional energy generated by projects covered under the said Government Resolution and used for their own captive consumption, from payment of electricity duty, in pursuance of the Government's policy of promoting generation of power from non-conventional sources.

Now, therefore, in exercise of the powers conferred by Section 5 A of the Bombay Electricity Duty Act, 1958 (Bom. XL of 1958), the Government of Maharashtra exempts the captive consumption of energry generated and distributed in the State through all non-conventional energy projects under the said policy from payment of the electricity duty payable under clause (*b*) of Part G of the Schedule to the said Act, for a period of first ten years from the date of commencement/implementation of non-conventional energy projects which have been established on or after 14th October 2008.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

D. K. KHARAT,

Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.